श्री महादेव मल्हारी ढाकणे,ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत जातेगाव,ता.जामखेड जि.अहिल्यानगर यांना ग्रामपंचायत अधिकारी या पदावरुन तात्पुरते दुर करणे बाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्रमांक- साप्रवि-२/ग्रापं-३/३८६/२०२६
दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भ :- १.पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर यांचेकडील पत्र क्र. लाप्रवि/अहिल्यानगर युनिट/११९०/२०२६, दिनांक- १३/०८/२०२६.
२.सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.सीडीआर १०९९/प्र.क्र.६२/९९/११अ, मुंबई दिनांक ०३ एप्रिल,२०००

संदर्भ क्र.१ अन्वये पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग.अहिल्यानगर यांनी संदर्भीय पत्रानुसार, श्री महादेव मल्हारी ढाकणे,ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत जातेगाव,ता.जामखेड यांचे विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायदयाखाली दिनांक- १२/०८/२०२६ रोजी गुन्हा दाखल केलेबाबत कळविले आहे.

सदरचे पत्रात तक्रारदार यांचेकडे बोरखेड,ता.जि.बीड या गावच्या सरपंच जिजाबाई सुनिल काळे यांची ग्रामपंचायत जातेगाव,ता.जामखेड यांच्या नावाने सन १९८८ मध्ये जन्म नोंद ग्रामपंचायत जातेगाव येथे जन्म मृत्यु रजिस्टरमध्ये नोंद आहे किंवा नाही याची माहिती देण्याकरीता पंचासमक्ष १००००/- रुपये लाचेची मागणी केली. दि.११/०८/२०२६ रोजी आयोजित सापळा कारवाई दरम्यान जामखेड खर्डा रोडवरील हॉटेल महाभगवती या ठिकाणी लोकसेवक ढाकणे यांनी लाचेची रक्कम रु.५०००/- रुपये तक्रारदार यांचेकडून पंचासमक्ष स्विकारली. तसेच तक्रारदारांकडे उर्वरीत ५०००/- रुपये नसल्याने त्यांनी आलोसे यांना फोन पे द्वारे उर्वरीत रक्कम ५०००/- रुपये देतो असे सांगितल्याने, त्यास आलोसे यांनी संमती दिली त्यावेळी आलोसे महादेव ढाकणे यांना रंगहात पकडण्यात आल्याने जामखेड पोलीस स्टेशन,जि.अहिल्यानगर गु.र.नं.५४६/२०२६ भ्र.प्र.का. कलम ७ प्रमाणे दि.१२/०८/२०२६ रोजी ०१/१८ वा.गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी लोकसेवक यांना दिनांक १२/०८/२०२६ रोजी मा.विशेष न्यायालय,श्रीगोंदा येथील न्यायालयासमोर हजर केले असता मा.न्यायालयाने त्यांना दिनांक १३/०८/२०२६ रोजी पोलीस कोठडी मंजूर केली होती. त्यानंतर मा.न्यायालयाने लोकसेवक महादेव ढाकणे यांना १४ दिवस न्यायालयीन कोठडी मंजूर केली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६४ मधील नियम ३- पदावरुन तात्पूरते दुर करणे- पोट नियम (१) (ब)- कोणत्याही फौजदारी गुन्ह्याच्या संबंधीतील त्यांच्या विरुध्दच्या प्रकरणाचा बारीक तपास किंवा न्याय चौकशी करण्यात येत असेल त्याबाबतीत नियुक्ती प्राधिकरण कर्मचा-यास पदावरुन निलंबित करु शकेल.

उक्त नमुद केलेनुसार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर यांनी कार्यवाही करुन लाचलुचपत प्रतिबंधक कायदयाखाली दि.११/०८/२०२६ रोजी १६/५२ वा लाच रक्कम स्विकारल्यानंतर ताब्यात घेण्यात आले असुन दिनांक १२/०८/२०२६ रोजी ०२/४३ वाजता अटक नोंद घेण्यात आली आहे. त्यामुळे मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चा नियम ३ चे १(ब) व संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयामधील मुद्दा क्रमांक ०७ (ब) अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन श्री महादेव मल्हारी ढाकणे,ग्रामपंचायत अधिकारी यांना स्थानबध्दतेचा दि.१२/०८/२०२६ पासून जिल्हा परिषद सेवेतून निलंबीत करीत आहे.

पुढे असाही आदेश देत आहे की, निलंबन काळात श्री महादेव मल्हारी ढाकणे,ग्रामपंचायत अधिकारी, यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहन अवधी स्वियेत्तर सेवा निलंबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांचे

काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६८ (१) नुसार मुळ वेतनाच्या ५० टक्के व त्यावर आधारीत महागाई भत्ता व इतर मिळणारे भत्ते जिल्हा परिषदेच्या सेवेतून सेवा निलंबित केल्यापासून मिळणेस पात्र राहील.

त्याप्रमाणे निलंबनाचे कालावधीत, श्री महादेव मल्हारी ढाकणे,ग्रामपंचायत अधिकारी, यांना खाजगी नोकरी, खाजगी धंदा व व्यवसाय करीत नाही. जर त्यांनी सेवा निलंबन काळात नोकरी, धंदा व इतर व्यवसाय केल्यास ती गैरवर्तणूक होऊन व त्या कारणासाठी ते शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र राहतील. तसेच श्री महादेव मल्हारी ढाकणे,ग्रामपंचायत अधिकारी हे निर्वाह भत्ता मिळण्याचा हक्कही गमावतील. जो पर्यंत निलंबनाचा आदेश अस्तित्वात आहे. तो पर्यंत श्री महादेव मल्हारी ढाकणे,ग्रामपंचायत अधिकारी, मुख्यालय पंचायत समिती --------कर्जत--------- येथे राहील. श्री महादेव मल्हारी ढाकणे,ग्रामपंचायत अधिकारी, यांना गटविकास अधिकारी, पंचायत समिती ------कर्जत-------- यांचे पुर्व मंजूरी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही अथवा त्यांना गैरहजर राहता येणार नाही. जर गैरहजर राहीले तर ती कृती गैरवर्तणूक ठरेल आणि श्री महादेव मल्हारी ढाकणे,ग्रामपंचायत अधिकारी, हे शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र राहतील.

गटविकास अधिकारी,पंचायत समिती ------कर्जत------ यांनी श्री महादेव मल्हारी ढाकणे, ग्रामपंचायत अधिकारी, यांना निर्वाह भत्ता देण्यापुर्वी महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वियेत्तर सेवा निलंबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांचे काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६९ (१) अनुसार प्रत्येक महिन्यास प्रमाणपत्र घ्यावे.

या आदेशाची नोंद श्री महादेव मल्हारी ढाकणे,ग्रामपंचायत अधिकारी, यांच्या मूळ सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी. सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२६०८२७०६०७२६ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 27-08-2026 12:52:06
(आनंद भंडारी,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री महादेव मल्हारी ढाकणे,ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत जातेगाव,ता.जामखेड

व्दारा व प्रत :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड .

प्रत :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड, जि. अहिल्यानगर

२/-सदर आदेश संबंधितांना तात्काळ बजावून दिनांकीत स्वाक्षरी घेण्यात यावी व सदरची प्रत उलट टपाली या कार्यालयास विना विलंब सादर करावी.

प्रत :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती ----कर्जत---------जि.अहिल्यानगर यांना पुढील कार्यवाहीसाठी

प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर.

प्रत :- ग्रामपंचायत, आस्थापना कार्यासन- ग्रापं-१, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना पुढील कार्यवाहीसाठी